ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १० जून, १९५३ अंक २१

## विविध माहिती

**सरकार गिरणी चालविणार**—उज्जैन येथील नाझरअली टेक्स्टाइल मिलच्या कारभाराबाबत चौकशी करण्याचा हुकूम मध्य भारत सरकारनें काढला आहे. गिरणीच्या चालकांनीं ती बेमुदत बंद ठेवण्याचें ठरविल्यामुळें सरकार गिरणी ताब्यांत घेऊन चालविणार आहे असें समजतें.

**सौराष्ट्रांमधील नदी योजना**—सौराष्ट्र सरकारनें वढवाण जवळ वहाणाऱ्या भोगाव ह्या नदीवर एक मोठें धरण बांधण्याचें ठरविलें आहे. धरणाला ५० लाख रुपये खर्च येणार असून तें पूर्ण झाल्यावर ३ गांवांना विजेचा पुरवठा होईल आणि शेंकडो जमिनीला पाणी–पुरवठा करतां येईल. दुष्काळी म्हणून प्रसिद्ध असलेल्या झालवाड जिल्ह्याला धरणाचा विशेष फायदा होईल.

**हैद्राबादमधील कोळशाचें उत्पादन**—हैद्राबाद राज्यांत कोळशाच्या चार खाणी आहेत. सर्व खाणींतून गेल्या एप्रिल महिन्यांत १,१५,८६५ टन कोळसा बाहेर काढण्यांत आला. त्याच महिन्यांत राज्यांतील सोन्याच्या खाणींतून ९८५ औंस सोनें काढण्यांत आलें. सिमेंटच्या कारखान्यांनीं १३,१७२ टन सिमेंट तयार केलें.

**बिहार राज्यांत आणखी टयूब वेल्स**—बिहार राज्यांत टयूब वेल्स खणण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें ८९.६१ लाख रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकी १६½ लाख रुपये खर्चून द. बिहारमध्यें आणखी २०० टयूब वेल्स खोदण्याचें राज्य–सरकारनें ठरविलें आहे. राज्य–सरकारनें १९६ विहिरी खोदल्या असून सहकारी तत्त्वावर १५ विहिरी खोदल्या आहेत. अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी विहिरी खोदण्यांत येत आहेत.

**अफू खाणारांची संख्या**—प. बंगालमध्यें १,८६,१०० लोक नियमितपणें अफूचें सेवन करणारे असून ते दरवर्षी ३४३ मण अफू फस्त करतात. खुद्द कलकत्त्यांत ४४,७०० माणसें १२३ मण अफू खातात आणि चोवीस परगाणा जिल्ह्यांत ३७,६०० जण ७६ मण अफू खातात. प. बंगालमध्यें अफू शिध्याप्रमाणें वांटली जाते.

**पू. बंगालमधील निर्वासितांची सोय**—पूर्व–बंगाल सरकारनें शीतलख्या नदीच्या कांठीं निर्वासितांसाठी एक नगर वसविलें आहे. नगर वसविण्यासाठी १०,५०,००० रुपये खर्च आला असून त्यांत ५०० निर्वासित कुटुंबांची सोय करण्यांत आली आहे.

**कोळयांच्या परिस्थितीची चौकशी**—प. किनाऱ्यावरील कोळी लोकांच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठी भारतीय सरकारनें एका खास अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. अशी चौकशी करण्याचें आश्वासन अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं पार्लमेंटमध्यें नुकतेंच दिलें होतें.

**राज्यारोहणाला येणाऱ्या विमानांची गर्दी**—राज्यारोहणासाठी विमानानें लंडनला जाणाऱ्या प्रवाशांनीं बरीच गर्दी उडविली होती. लंडनमधील विमानतळावर दर १५ मिनिटांनीं एक विमान उतरत होतें. तरीहि कित्येक विमानांना आपली पाळी येण्याची वाट पहात बराच वेळ आकाशांतच भ्रमण करावें लागलें. एका अमेरिकन विमानाला तर तासभर हवेंत घिरट्या घालाव्या लागल्या.

**रशिआमधील इस्पितळें**—भारताच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकुवर ह्यांनीं मॉस्कोमधील मेडिकल इन्स्टिटयूटला भेट दिली. त्याप्रसंगीं त्यांना कांहीं शास्त्रीय चित्रपट दाखविण्यांत आले. हृदयाची क्रिया दाखविणारा एक चित्रपटहि दाखविण्यांत आला. रशिआंत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना असे चित्रपट नेहमी दाखविण्यांत येतात.

**नाशिक जिल्ह्यासाठी विकासयोजना**— पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्याच्या विकासाची योजना जिल्हा विकास–बोर्ड आखीत आहे. पाणीपुरवठा, रस्ते, लहान व मोठीं पाटबंधाऱ्यांचीं कामें, इत्यादींचा समावेश योजनेंत करण्यांत आला असून तीसाठी १६.५८ कोटी रुपये खर्च येईल.

**चित्रपटांची देवाणघेवाण**—मि. केनेथ रिग ह्या नांवाचे एक ब्रिटिश चित्रपट–वितरक सध्यां मॉस्कोला गेले आहेत. ब्रिटनचे ३० चित्रपट देऊन त्यांच्या बदली रशिआचे कांहीं सर्वोत्तम चित्रपट ब्रिटनमध्यें दाखविण्याचा त्यांचा विचार आहे. रशिअन निर्मात्यांनीं ऐतिहासिक, चरित्रात्मक अगर सांस्कृतिक चित्रपटावरच लक्ष केंद्रित न करतां विनोदी आणि प्रेमकथात्मक चित्रपटहि काढावे असा सल्ला ते देणार आहेत. असें केल्यास रशिअन बोलपटांना जगाची बाजारपेठ लाभेल, असें त्यांचें मत आहे.

**कार्ल मार्क्सचें थडगें हलविणार**—लंडनच्या उत्तर भागांतील एका कोपऱ्यांत कॉर्ल मार्क्स ह्याचें थडगें आहे. तें तेथून अधिक प्रमुख ठिकाणीं हलविण्याचा विचार ब्रिटिश कम्युनिस्ट करीत आहेत. सध्या हें थडगें मार्क्स मेमोरिअल लायब्ररी ह्या संस्थेच्या ताब्यांत आहे. थडगे ब्रिटनच्या बाहेर हलविण्यास संस्थेचा विरोध आहे.

**राज्यारोहणाचा अनुबोधपट**—इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणाविषयींच्या भारतमधील समारंभाचा ३०० फूट लांबीचा अनुबोधपट भारतीय सरकारच्या चित्रपट विभागानें तयार केला व तो राज्याभिषेकाच्या दुसऱ्या दिवशींच विमानानें लंडनला पाठविण्यांत आला.

## दारिद्र्याच्या उच्चाटनासाठी स्वदेशीचा पुरस्कार

(प्रा. ना. ग. नारळकर)

सुराज्याचें पहिलें गमक म्हणजे व्यापारदृष्ट्या सर्वत्र फार मोठी समृद्धि आली पाहिजे. दारिद्र्याचें अजिबात उच्चाटन झालें पाहिजे. आम जनतेला खाण्यापिण्याची यत्किंचितहि ददात केव्हांहि न पडली पाहिजे. हें घडून येण्यास राज्याधिकारी यांचें मनांत स्वदेशी प्रेम ओसंडलें पाहिजे, व त्याकरितां खालील गोष्टी करावयास पाहिजेत.

(१) साहेबाच्या राज्यांतहि सरकारी कचेऱ्यांतून शक्यतोंवर स्वदेशी माल वापरावा असा आदेश असे, पण "शक्यतोंवर" या शब्दप्रयोगाचा सोयीस्कर अर्थ करून साहेबाला खूष करण्याकरितां, त्यावेळचे राज्याधिकारी बहुसंख्य प्रमाणावर परदेशीच माल वापरीत. १९३६ साली, एक सरकारी मंत्री आमच्या विद्यार्थी–भांडारांत आले होते. तेथील विविध स्वदेशी वस्तूंचें भरघोस प्रदर्शन पाहून ते म्हणाले, "आमचे सेक्रेटरी स्वदेशी माल मिळत नाहीं म्हणून सांगतात किंवा फार "गावठी" असतो अशी तक्रार करतात, काय करावें?" यावर एक तोडगा असा आहे कीं राज्याधिकारी काय किंवा खाजगी संस्थेचा अधिकारी काय, त्यांनीं अशी सक्त ताकीद दिली पाहिजे कीं शक्य तोंवर स्वदेशी; स्वदेशी उपलब्ध नसल्यासच, अधिकाऱ्यांच्या "लेखी पूर्व परवानगीनें", परदेशी माल घ्यावा.

(२) सरकारी असो, अथवा खाजगी असो, मुख्याधिकारी यांनीं कामाचीं, मालाचीं वगैरे टेंडर्स मागवितांना स्वदेशी कंपन्यांनाच, त्यांचें टेंडर थोडें महाग असलें तरी, किंवा मालांत थोडें डावे–उजवें असले तरी निर्धारपूर्वक परदेशी कंपन्यांना डावलून आपल्या देशबंधूंकडेच, काम सोंपविलें पाहिजे.

नुकतीच घडलेली गोष्ट. अमेरिकेच्या वॉशिंग्टननें एक धरण बांधण्याचें टेंडर मागविलें होतें. त्यांत अमेरिकन कंपनीनें ३ कोट रुपये तर एका इंग्रज कंपनीनें सर्वांत कमी म्हणजे २ कोटी ५५ लक्ष रुपये मागितले होते. तरी पण १५ टक्केचा, रु. ४५ लक्षांचा तोटा सोसून, दूर दृष्टी ठेवून, अमेरिकन कंपनीसच टेंडर देण्यांत आलें. हें चित्र पहा आणि हें चित्र पहा कीं, सडकीला स्वदेशी इंजिनें गिऱ्हाईक नाहीं म्हणून पडून आहेत, कामगारांचे कामाचे दिवस कमी करावे लागत आहेत व आमचे दिल्लीकर परदेशी एंजिनांची आयात करण्याचे परवाने मुक्तहस्तानें "आवजाव घर तुमारा" या भूमिकेनें देत आहे कीं काय असें वाटतें!

(३) याकरितां स्वदेशीच्या आस्थापूर्वक संवर्धनाबरोबर लोकमान्यांची स्मृति सदैव जागृत ठेवून परदेशी बहिष्काराची चळवळ जोरानें हातीं घ्यावयास पाहिजे. देशांत औद्योगिक उन्नतीस आवश्यक अशा परदेशी यंत्रसामुग्रीखेरीज इतर सर्व मालाला कटाक्षानें मज्जाव केला पाहिजे. कांहीं वर्षे स्वदेशी उद्योगधंद्यांस असें संरक्षण दिल्यास, आपण स्वावलंबी होऊं शकूं.

(४) उठल्या सुटल्या, पडेल ती महागडी किंमत देऊन, सत्तेच्या जागांवर, परदेशी तथाकथित तज्ज्ञांना नेमण्याची घातुक प्रथा मोडली पाहिजे. 'अतिपरिचयात् अवज्ञा' या न्यायानें नजीकच्या आपल्या कर्तबगार कार्यकर्त्यांना डावलून, न्यूनगंडाचे आहारीं जाऊन ही जी आयात केली जाते ती ताबडतोब थांबविली पाहिजे. एवढेंच नव्हे तर येथें तळ देऊन सुखासीन झालेल्या परकीय अधिकाऱ्यांना त्वरित रीतसर नोटीस देऊन त्यांची हकालपट्टी केली पाहिजे; त्यामुळें कांहीं काळ बेबंदशाही माजली तरी चालेल. पण आमच्या देशाची सूत्रें आम्हां स्वकीयांच्याच हातांत पाहिजेत.

(५) व शेवटीं साहेबाचें काय किंवा कोणाही परकीयांचे काय गुणगान खुशाल करावें. आदरणीय अशा गुणांची मुक्तकंठानें स्तुती करण्यांत गुणग्राहकताच व्यक्त होते; परंतु त्याबरोबर लगेच, "नाहीं तर आम्हीं!" हें पालुपद सुतकी चेहऱ्यानें म्हणण्याची दरिद्री प्रथा मुळासकट निपटून काढली पाहिजे. 'आम्ही महाराष्ट्रीय कोणत्याहि क्षेत्रांत, कोणाही परदेशीयांचे बरोबर, मांडीस मांडी लावून, तोडीस तोड देऊन, बरोबरीचा सामना हमखास करूं हा आत्मप्रत्यय सदैव वाणला पाहिजे.

(व्यापारी महाराष्ट्र, १५-५-५३)

---

### चीनच्या नाकेबंदी विषयींचें मर्मस्थान

कोरिआंत चालू असलेल्या युद्धांत उत्तर कोरिआच्या बाजूनें चिनी स्वयंसेवकांनीं भाग घेतलेला आहे. चीन सरकारच्या संमतीनेंच ही घटना घडलेली असल्यामुळें चीनची संपूर्ण नाकेबंदी करण्यांत यावी अशी सूचना अमेरिकेंतील कांहीं लोक करीत असतात. चीनची नाकेबंदी करण्यांत काय अडचणी आहेत तें अमेरिकन सीनेटच्या फारिन रिलेशन्स कमिटीपुढें देण्यांत आलेल्या साक्षीवरून चांगलें कळून येतें. कमिटीपुढें साक्ष देतांना अमेरिकन सरकारच्या एका प्रवक्त्यानें असें सांगितलें कीं सबंध चिनी किनाऱ्याची नाकेबंदी यशस्वी होणार नाहीं आणि तीमुळें अमेरिकेच्या दोस्तांचीं मनें दुखावतील. पण हीं कारणें राजकारणांतील झाली. त्याशिवाय कांहीं आर्थिक कारणेंहि आहेत. आज चीनला जो माल आयात करावा लागतो त्यापैकीं ७० टक्के माल रशिआ पुरवीत आहे. चीनमधील दोन मोठीं बंदरें, पोर्ट आर्थर आणि डायरेन, ह्यांवर रशिआचें नियंत्रण आहे. त्यामुळें त्यांची नाकेबंदी शक्यच नाहीं. चीन भारताकडून कापूस आयात करतो आणि पाकिस्तानकडून ताग आयात करतो. ही निर्यात नाकेबंदीमुळें थांबली तर भारत आणि पाकिस्तान ह्यांच्या अर्थव्यवस्थेंत घोटाळे उत्पन्न होतील. भारताला व पाकिस्तानला वरील माल चीनला पाठवून चीनकडून तांदूळ घ्यावा लागतो. त्यांची निर्यात थांबविल्यास त्यांना लागणारा तांदूळ त्यांनीं कोठून आणि कसा मिळवावा हाहि प्रश्न आहे. सीनेटपुढें मांडण्यांत आलेल्या पुराव्यावरून असें दिसतें कीं अमेरिकेच्या दोस्तांना चीनबरोबर व्यापार करूं दिला नाहीं तर हे दोस्त लोक अमेरिकेकडेच आपल्याला लागणाऱ्या मालाची मागणी करूं लागतील आणि त्यामुळें अमेरिकेवरील आर्थिक ताण वाढेल.

---

**पंचवार्षिक कार्यक्रमाला कैद्यांची मदत**— बडोदा येथील मध्यवर्ती तुरुंगांत शिक्षा भोगीत असलेल्या कैद्यांनीं आपल्या मिळकतींपैकीं कांहीं भाग पंचवार्षिक कार्यक्रमाला देणगी म्हणून देण्याची इच्छा दर्शविली आहे. ह्या देणग्या स्वीकारण्याची परवानगी तुरुंगाधिकाऱ्यांनी मुंबईच्या पोलिस प्रमुखाकडे मागितली आहे.

**टायर्स देऊन तेल घेणार**—इराणला मोटारींचे टायर्स पुरवून त्यांच्या बदली तेल घेण्याच्या वाटाघाटी जपानमधील ब्रिजस्टोन टायर कंपनी सध्या करीत आहे. वाटाघाटी यशस्वी झाल्यास जपानच्या सरकारकडून अशी देवाणघेवाण करण्यासाठी परवानगी घ्यावी लागेल.

**वेतन ठरविण्यासाठी बोर्ड**—हैद्राबाद राज्यांतील मजुरांना मिळणारा महागाईभत्ता आणि इतर प्रश्न सोडविण्यासाठीं हैद्राबाद सरकार एक बोर्ड निर्माण करणार आहे असें समजतें. रेगे कमिटीनें केलेल्या शिफारसी लक्षांत घेऊन ही नवी व्यवस्था करण्यांत येत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १० जून, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परकीय भांडवलाविरुद्ध तक्रार

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेनें भारतीय सरकारच्या व्यापार आणि उद्योग खात्याला एक खलिता पाठवून अशी तक्रार केली आहे कीं भारतीय सरकारनें परकीय भांडवलाबाबत जे उदार धोरण स्वीकारलें आहे त्यामुळें परकीय भांडवल भारतांत येण्यास मदत तर होत नाहींच; पण उलट देशी धंद्यांना अडचणी मात्र निर्माण होत आहेत. भारताचा औद्योगिक विकास करण्यासाठीं भांडवलाची जरूर आहे. परंतु सध्यां ज्या क्षेत्रांत भारतीय भांडवल गुंतलेलें आहे त्याच क्षेत्रांत परकीय कंपन्यांना हातपाय पसरण्यास वाव देऊन भारतीय सरकार घरच्या भांडवलाला अडचणींत टाकीत आहे. ऑगस्ट १९४७ पासून ६५ परकीय कंपन्यांनीं भारतांत भांडवल उभारण्यासाठीं सरकारकडे अर्ज केले. सर्व अर्जांत मिळून २१,६६,००,००० रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मागण्यांत आली होती. परकीय पण भारतांत नसणाऱ्या अशा कंपन्यांना १९,५५,००,००० रुपये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. हें भांडवल कांहीं फार होतें असें नाहीं. जितक्या भांडवलाला परवानगी मिळाली त्यांपैकी ३२ टक्के भांडवल मॅनेजिंग एजन्सी असलेल्या कंपन्यांचें व व्यापारी कंपन्यांचें होतें. औद्योगिक कंपन्यांनाहि भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. औषधें, यंत्रें, सिगारेटस्, साबण, टाइपरायटर्स, ह्यासारख्या वस्तू निर्माण करणाऱ्या परकीय कारखान्यांनाहि भांडवल उभारूं देण्यांत आलें. वास्तविक ह्या धंद्यांतून बरेंच हिंदी भांडवल गुंतलेलें आहे; त्याशिवाय ॲल्युमिनम, रंग, वुड स्क्रू इत्यादि वस्तु निर्माण करणाऱ्या परकीय कंपन्याहि आपलें क्षेत्र वाढवीत आहेतच. ज्या उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत हिंदी भांडवल गुंतलेलें नाहीं अगर दृष्टीच्या टप्प्यांतील भविष्यकालांत गुंतविलें जाण्याची शक्यता नाहीं त्या क्षेत्रांत परकीय भांडवल मोठ्या प्रमाणांत आलें तर त्याचें फेडरेशन स्वागत करील. पण हिंदी भांडवलाच्या वाजवी क्षेत्रांत मात्र परकीय भांडवलाला शिरकाव करूं देऊं नये.

परकीय भांडवलाचें क्षेत्र कोणतें ह्यासंबंधी फेडरेशननें आपलें म्हणणें मांडलें आहे. ज्या उद्योग धंद्यांत विशेष प्रकारचें तांत्रिक कौशल्य लागत असेल आणि असे उद्योगधंदे जर भारतांत विकास पावलेले नसतील तर त्यांत परकीय भांडवल गुंतविण्यास फेडरेशनची हरकत नाहीं. किंवा ज्या उद्योगधंद्यांना भारतीय भांडवल मिळतच नाहीं अशा उद्योगधंद्यांतहि परकीय भांडवलाला वाव द्यावा असें फेडरेशनचें म्हणणें आहे. ज्या उद्योगधंद्यांतील वस्तू भारतीय बाजारपेठांच्या गरजा भागवून उरूं शकतात अशा उद्योगधंद्यांतहि परकीय भांडवलाला मनाई करण्यांत यावी अशी विनंति करण्यांत आली आहे. सरकारचें जर असें म्हणणें असेल कीं कांहीं विवक्षित वस्तूंच्या कारखान्यांची उत्पादन क्षमता शक्यतेच्या कोटातील खपापेक्षा नेहमींच अधिक असली पाहिजे तर, अशा वस्तू तयार करणाऱ्या देशी कारखान्यांना प्रथम मदत देण्यांत यावी. किंवा अशा प्रकारचे कारखाने काढण्यास देशी कारखानदार तयार असतील तर त्यांना मदत करण्यांत यावी. भारतीय सरकारला कारखानदारांच्या हिताबरोबरच ग्राहकांच्या हिताचीहि काळजी वहावयाची असल्यानें फेडरेशनचें सर्व म्हणणें सरकार मान्य करील असा संभव अर्थातच नाहीं. तथापि, परकीय भांडवल देशी भांडवलाच्या मुळावर येऊं नये इतक्यापुरतें फेडरेशनचें म्हणणें मान्य करतां येण्यासारखें आहे.

---

## रेल्वेचे डबे तयार करण्याचा कारखाना निघणार!

भारतीय रेल्वेचे डायरेक्टर ऑफ रेल्वे फिनॅन्स श्री. के. सद्गोपन् हे स्विट्झरलंडमध्यें गेले होते. त्यावेळीं मेसर्स स्लायरेन नांवाच्या एका रेल्वेचे डबे तयार करण्याच्या कारखान्याला त्यांनीं भेट दिली. १९४९ सालीं भारतीय रेल्वे बोर्डानें ह्या कारखान्याशी बारा वर्षें मुदतीचा एक करार केलेला आहे. ह्या करारांतील अटी पुढीलप्रमाणें आहेत. (१) भारतांत हलक्या वजनाचे पोलादाचे रेल्वेचे डबे तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठीं कारखान्यानें सर्व प्रकारचें साह्य द्यावें. (२) भारत सरकार ज्या तज्ज्ञांना व एंजिनिअर्सना शिक्षणासाठीं स्विट्झरलंडमधील कारखान्यांत पाठवील त्यांना तांत्रिक शिक्षण द्यावें. ह्याचा मोबदला म्हणून भारतीय सरकारनें कारखान्यांकडून दरवर्षी ५० रेल्वेचे डबे बांधवून घ्यावे. पहिल्या चार वर्षांपुरतेंच हें बंधन अस्तित्वांत रहावें. अर्थात वरील डबे भारतीय सरकार ज्या पद्धतीचे मागेल त्या पद्धतीचे पुरवावयाचे आहेत. तांत्रिक अटी पाळण्याबद्दल १९५१ अखेरच्या तीन वर्षांसाठीं भारतीय सरकारनें ८,८०,००० फ्रँक्स कारखान्याला दिले आहेत. ह्या कराराबद्दल पब्लिक अकौंटस कमिटीनें कांहीं टीका नुकतीच केलेली आहे. करारांत कांहीं बदल करतां येईल किंवा नाहीं तें पहाण्यासाठीं भारतीय सरकारनें श्री. सद्गोपन् ह्यांना स्विट्झरलंडमध्यें पाठविले होते. श्री. सद्गोपन् ह्यांनीं आपला अहवाल आतां सरकारला सादर केला असून तो समाधानकारक आहे असें समजतें. करारामधील कांहीं प्रतिकूल अटी रद्द करण्याचा विचार करण्यासाठी स्लायरेन कंपनीचे प्रतिनिधी चालू महिन्यांत भारतांत येणार आहेत असेंहि समजतें. करार दुरुस्त करण्यांत आल्यावर भारतांत रेल्वे डबे तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार पुढें चालू होईल.

---

## बेकारींत वाढ

भारतांतील ठिकठिकाणच्या उद्योगविनिमय केंद्रांत एप्रिल, १९५३ अखेर नोंदणी केलेल्या बेकारांची संख्या ४,५५,४१७ होती. हा आंकडा या खात्याकडे आतांपर्यंत नोंद झालेल्या अशा आंकड्यांत सर्वांत अधिक आहे. एप्रिल महिन्यांत १६,२३२ लोकांस नोकऱ्या मिळवून देण्यांत आल्या.

### घाऊक किंमतीचा निर्देशांक

भारतांतील घाऊक किंमतींचा निर्देशांक, (मूळ प्रमाण : ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष =१०० धरून) २३ मे १९५३ रोजीं संपलेल्या आठवड्यांत ०·४ टक्क्यानें वाढून ३९९·० वर गेला. गेल्या महिन्याच्या व गेल्या वर्षीच्या या आठवड्यांतील निर्देशांकापेक्षा तो अनुक्रमें २·५ व ९·१ टक्क्यांनीं जास्त आहे.

पुनर्विलोकनाच्या या आठवड्यांत हापूर व अमृतसर येथें गहूं (प्रत्येकीं २ टक्के), गूळ (६ टक्के) व ज्वारी (४ टक्के) यांच्या किंमतींत वाढ झाल्यानें 'अन्नपदार्थ' या गटाचा निर्देशांक आणखी ०·९ टक्क्यानें वाढून ३८५·२ झाला. याच कालांत बाजरी (–२ टक्के) व साखर (–१ टक्का) यांच्या किंमतींत घट झाली.

'औद्योगिक कच्चा माल' गटांतील अशुद्ध मँगेनिज (१२ टक्के) अमरावती येथें उमरा कापूस व ज्यूट (प्रत्येकीं २ टक्के) यांच्या किंमती उतरल्या असल्या तरी लोकर, शिरसू व अळशी (प्रत्येकीं ४ टक्के), एरंडी व सरकी (प्रत्येकीं ३ टक्के), मुंबई येथें जरीला, पंजाब अमेरिकन व बंगाल कापूस, कच्चीं कातडीं व खोबरें (प्रत्येकीं २ टक्के) यांच्या किंमती वाढल्यानें त्यांचाहि निर्देशांक या आठवड्यांत ४७९·० वरून ४७९.६ वर गेला.

भुईमुगाची पेंड (६३ टक्के), कापसाचें सूत व जस्त (प्रत्येकीं ४ टक्के), खोबऱ्याची पेंड (३ टक्के), म्हशींचीं कातडीं (२ टक्के) व पितळ (१ टक्का) आणि तेलें यांच्या किंमतींत आणखी वाढ झाल्यानें 'अर्ध-पक्का माल' गटाचा निर्देशांक आणखी ०·७ टक्क्यानें वाढून ३६२·३ वर गेला. बकऱ्यांचीं कातडीं (–५ टक्के) व मेंढ्यांचीं कातडीं (–२ टक्के) यांच्या किंमतींत मात्र घट झाली.

तागी माल (–२ टक्के) व रंग (–३ टक्के) यांच्या किंमती उतरल्यानें 'पक्का माल' गटाचा निर्देशांक ०·२ टक्क्यानें कमी होऊन ३६९-१ वर आला.

या आठवड्यांत सुपारीच्या किंमतींत १ टक्क्याची घट होऊनहि हळद (३ टक्के) व काजू (१ टक्का) यांच्या किंमती वाढल्यानें 'संकीर्ण वस्तू' गटाचा निर्देशांक ६२०·० वरून ६२१·० वर गेला.

---

### त्रि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि., मंजुमेल

वरील कंपनीच्या कारखान्यांत फेब्रुवारी व मार्च, १९५२ मध्यें दीर्घकाल संप चालूं होता. त्यावेळीं उत्पादन बंद होतें तरी एस्टॅब्लिशमेंट खर्च चालूच ठेवावा लागला. १९५१ मध्यें ७,१०,००० रु. चें उत्पादन झालें होतें, तें १९५२ मध्यें ५,७०,००० रु. वर आलें. सहाजिकच, कंपनीस १९५२ मध्यें ९१,९४४ रु. नुकसान आलें. बाजारभावास अनुसरून कंपनीच्या मालाचे दर उतरवावे लागले, परंतु उत्पादन–खर्च त्या प्रमाणांत उतरूं शकला नाहीं. नफा–तोटा पत्रकांत नेहमींप्रमाणें घसाऱ्याची तरतूद करण्यांत आली आहे. इन्कमटॅक्स कायद्यांतील कलमांस अनुसरून प्राथमिक व जादा घसारा काढलेला असून पुढील नफ्यांतून कायद्यास संमत असा आणखी घसारा काढला जाईल. कामगारविषयक परिस्थिति समाधानकारक नाहीं. नोव्हेंबर १९५२ मध्यें कामगारांनीं केलेल्या मागण्यांचा अद्याप निकाल लागावयाचा आहे. बदललेल्या व्यापाराच्या परिस्थितीची कामगारांना जाणीव नाहीं. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें मंजूर केलेल्या ५ लक्ष रु. कर्जापैकी ३ लक्ष रु. जून १९५२ अखेर मिळाले. आवश्यक ती सामुग्री बव्हंशीं आली असून, सध्याची बीजकपात रद्द होतांच "ऑटोमॅटिक बॉटल प्लँट" सुरुं करण्यांत येईल. त्यामुळें उत्पादन वाढेल व उत्पादन–खर्चांतहि बरीच बचत होईल.

### वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीनें १९५२ मध्यें २ कोटी, ६९ लक्ष रुपयांचें नवें विमा–काम पुरें केलें. १९५१ मध्यें २ कोटी, ६८ लक्ष रुपयांचें काम कंपनीनें पुरें केलें होतें. १९५२ अखेर विमा–फंडांत ५५·११ लक्ष रुपयांची वाढ करण्यांत येऊन तो फंड ५ कोटी, ६० लक्ष रु. झाला. डिव्हिडंड पूर्वीप्रमाणेंच ३०% देण्यांत येईल.

---

### पाकिस्तानांत जपानी शेतकरी

जपानी सरकार पाकिस्तानकडे लवकरच शेतीचीं अवजारें व जपानी शेतकरी पाठविणार आहे. जपानी शेतीच्या पद्धतीचें प्रात्यक्षिक हे शेतकरी देणार आहेत.

---

### पाकिस्तानच्या आयात धोरणाचा परिणाम

पाकिस्तान सरकारनें आयातीवर कडक बंधनें घातल्यामुळें तेथील विदेशी कंपन्यांचा धंदा बराच कमी झाला आहे. कित्येक कंपन्यांतील नोकरांवर बेकारीची पाळी येणार आहे. लाहोरमधील कांहीं कारखान्यांनाहि उत्पादन आखडतें घ्यावें लागणार आहे. विदेशी कंपन्यांनींहि काटकसरीसाठीं नोकर कमी करण्यास प्रारंभ केला आहे.

---

### ग्राहक सहकारी सोसायटीच्या फेडरेशनचे नवे अध्यक्ष

मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. स. का. पाटील हे अखिल मुंबई ग्राहक सहकारी सोसायटीच्या फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून अविरोध निवडून आले. श्री. नगीनदास टी. मास्तर यांच्या निधनामुळें ही जागा खाली झाली होती. मुंबई व उपनगरांतील १४६ सहकारी संस्था या फेडरेशनशीं संलग्न आहेत.

---


**THE TRAVANCORE OGALE GLASS MANUFACTURING CO. LTD.**

# NOTICE

The Tenth Annual General Meeting of the Shareholders of the Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on **Saturday, the 27th June, 1953 at 6 p. m.** to transact the following business:

1. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the period ended 31st December, 1952.
2. To elect Directors in the place of those retiring.
3. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 15th June to Saturday, the 27th June, 1953, both days inclusive.

By Order of the Board,
FOR **Ogale Brothers, Limited,**
**N. P. Ogale,**
Managing Agents.

Trivandrum,
April 13, 1953.

## दुष्काळ निवारणाचा कायमचा उपाय : पाटबंधारे

### श्री. गं. ल. नातू यांचें भाषण

" महाराष्ट्रांत वरचेवर पडणारा दुष्काळ ही एक अतिशय बिकट समस्या असून नेहमींच दुष्काळ पडणाऱ्या या मोठ्या विभागांत पाटबंधाऱ्यांची व्यवस्था करणें हाच यावर कायमचा उपाय आहे. सध्यां हा प्रदेश पाणी-पुरवठ्याच्या अभावीं वैराण राहिला आहे व त्यांतून फारच थोडें पीक मिळतें, व तेंहि अनियमितपणें. परंतु या विभागांस भरपूर पाणीपुरवठा केला तर मात्र हाच प्रदेश लगेच सुजल व सुफल झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या कार्यासाठी पैसा लागेल पण तो कर्जरूपानें उभा करणें सरकारच्या आंवाक्याबाहेरचें मुळींच नाहीं. इतकेंच नव्हें तर माझी अशी खात्री आहे कीं, अशा रूपानें होणारा पैसा केवळ पाटबंधाऱ्यांवरच महाराष्ट्रासाठीं खर्च केला जाईल, इतर कोणत्याहि कामासाठी तो वापरला जाणार नाहीं असें सरकारनें निश्चित आश्वासन दिलें तर आवश्यक तो पैसा कर्जरूपानें आणि जरूर तर कररूपानें देण्यास जनता कुरकुरणार नाहीं. '

" महाराष्ट्राचे आठ जिल्हे आज भीषण दुष्काळाच्या मगरमिठींत सांपडले आहेत. दुष्काळ निवारणासाठीं सरकार व जनता यांनीं सर्व प्रकारचे भगीरथ प्रयत्न चालविले असून त्याबद्दल ते धन्यवादास पात्रच आहेत; तथापि हा प्रश्न कायमचाच सोडवायाला हवा व त्यासाठी मोठे पाटबंधारे बांधणें हाच उपाय आहे. "


पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कोयना बहुहेतुक प्रकल्पापैकीं निदान विद्युत् उत्पादन योजनेचा तरी समावेश करण्यांत आला आहे याबद्दल श्री. नातू यांनीं समाधान व्यक्त केलें व त्या प्रकल्पासाठीं संकल्पित केलेला पैसा भारत सरकारनें मुंबई सरकारला त्वरित द्यावा म्हणजे मुंबई सरकार ही योजना हातीं घेऊं शकेल असें सांगितलें. श्री. नातू पुढें म्हणाले, "यंत्रमाग म्हणजे हातमागांचेंच उत्क्रांत स्वरूप असून यंत्रमागांवर बंधनें घालूं पाहणें म्हणजे पूर्वींच्या हातमागांतुन उत्क्रांत होत गेलेल्या अशा त्यांच्याचमधील प्रगतिशील विभागाला पुनः खालीं दडपणें होय. म्हणून यंत्रमागांवर निर्बंध न घालतां हातमाग विणकरांची बिकट परिस्थिति दूर करण्यासाठीं त्यांना योग्य ती सर्व मदत अवश्य करण्यांत यावी. हातमाग व यंत्रमाग हे हातमागांचेंच परिणत स्वरूप आहे. "

लहान सूतकापड गिरण्यांच्या प्रश्नाबाबत श्री. नातू म्हणाले, कीं लहान गिरण्यांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठीं एखादी तज्ज्ञ समिति नेमावी ही नियोजन मंडळाची सूचना स्वागतार्ह आहे. मात्र दरम्यान अशा छोट्या गिरण्यांना किरकोळीच्या दरानें आपलें सूत थेट गिऱ्हाइकाला विकण्याची सरकारनें परवानगी द्यावी.

" भावउतारामुळें उद्योगधंद्याच्या आर्थिक व्यवस्थेवर झालेला तीव्र आघात आणि भारत सरकारचें सदोष आयात धोरण यांचा उल्लेख करून इतःपर जनता व सरकार यांनीं केवळ स्वदेशीचेंच नव्हे तर चढाईच्या स्वदेशीचें व्रत अंगिकारलें पाहिजे. मालमोटार वाहतूक सरकारनें सर्वस्वी आपल्याकडे मुळींच घेऊं नये व प्रतिपद्द विक्रीकरास व्यापारीवर्गाचा तीव्र विरोध असल्यानें, सरकारचें उत्पन्न न बुडतां व्यापारीवर्गास ही करयोजना स्वीकार्य कशी होईल याचा विचार करण्यासाठीं एक खास समिति सरकारनें नेमावी. "


SAVE to help yourself and the NATION

WITH THE HOME SAFE



THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]
पॅलेस स्ट्रीट, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ११-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

किर्लोस्कर



हातपंप

उन्हाळी पिकासाठीं व घरगुती पाणी पुरवठ्यासाठीं खात्रीची उपाय योजना.



सेंट्रिफ्युगल पंप

विशेष माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| सभासदांतर्फे | रु. | ३३,२५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ५९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. | ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,८५,०२,२०० |

### १५ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |

### एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सेनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

### संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिश्रण यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्याचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

## दि सांगली बँक लिमिटेड

सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

### मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :
मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

## परकीय भांडवलाबाबत हिंदी उद्योगपतींचा दृष्टिकोन

### व्यापार व उद्योगमंत्री, श्री. कृष्णम्माचारी, ह्यांचें भाषण

"खाजगी उद्योगधंद्यांचे पाठीराखे म्हणून हिंदी उद्योगपति नियंत्रणांविरुद्ध होते आणि सरकारनें कमी ढवळाढवळ करावी अशी त्यांची मागणी होती; अशीही वेळ येऊन गेली. खुल्या व्यापाराचें तत्त्वज्ञान निदान सुसंगत तरी होतें आणि ज्यांचे त्याविरुद्ध मत होतें त्यांनीहि त्याला मान दिला. आतां ही नवीन प्रवृत्ति आहे. अजूनाह उद्योगपती आपण खुल्या व्यापाराच्याच बाजूनें आहोंत असें म्हणायला तयार आहेत. पण त्याचवेळीं इतरांच्यावर या नाहीं त्या कारणास्तव नियंत्रणें वा बंधनें असावीत अशी विनंती करण्याचीहि त्यांची तयारी आहे. म्हणून देशांत तो करूं शकत असलेल्या कोणत्याहि वस्तूची आयात करूं देऊं नये आणि परकी हुंडणावळ वांचविण्यासाठी अंमलांत आणलेले आयात-नियंत्रण संरक्षणाचें एक साधन व्हावें अशी त्यांची मागणी आहे.

खासगी उद्योगधंद्यावरच एकाद्याची श्रद्धा असेल तर त्यानें त्या मागोमाग येणारी स्पर्धाहि मान्य केली पाहिजे. दुर्दैवानें सर्व प्रकारच्या अंतर्गत व बाह्य स्पर्धेपासून संरक्षण असलेली विक्रेत्याची बाजारपेठ असलेल्या गेल्या दशकांतील परिस्थितीमुळें खासगी धंदेवाल्यांनीं मोठमोठे उद्योगधंदे ज्या गोष्टीमुळें उभारलें तिचाच विसर पडला आहे. विक्रींत घट झाली तर आपली विक्रीची पद्धती चुकते आहे, किंवा आपल्या प्रसिद्धीमोहिमेंत दोष आहे, याचा विचार उत्पादक करीत नाहीं. ग्राहकाला पाहिजे तें आपण उत्पादन करीत आहों का, याचाहि विचार तो करीत नाहीं. उलट, तो सरळ सरकारकडे जाऊन या नाहीं त्या स्वरूपांत इतरांच्यावर बंधनें घालून कांहीं तरी मदतीची मागणी करतो.

"अशा स्वरूपाच्या निर्बंधात्मक कल्पनांचा त्याग केल्यावांचून औद्योगिक वाढीची आपणांस आशा करतां येणार नाहीं. सुदैवानें बहुतेक क्षेत्रांतील टंचाई दूर होत आहे. कल्पकता आणि दूरदृष्टी असलेल्या कोणत्याहि व्यक्तीस यामुळें खेद होण्याऐवजी आनंदच झाला पाहिजे. इतर देशांपेक्षा या आपल्या विस्तीर्ण देशांत, तयार झालेल्या कोणत्याहि पदार्थास ग्राहक मिळूं शकण्याचा संभव अधिक आहे. रोकड स्वरूपांतील उत्पन्न वाढत असून, पंचवार्षिक योजनेखालीं होणाऱ्या विकासात्मक खर्चांबरोबर मागील काळापेक्षा माल आणि नोकऱ्याबाबतच्या मागणींत निःसंशयपणें वाढच होणार आहे. अशा या परिस्थितींत विस्ताराऐवजीं निर्बंधाच्या स्वरूपांत विचार करणें सर्वथैव चुकीचें ठरेल. दुर्दैवानें अजूनहि कांहीं बाबतींत टंचाई भासत आहे. म्हणून नियंत्रणेंहि चालू आहेत. परंतु नियंत्रणाची यंत्रणा टंचाई निर्माण करण्यासाठी नसून तिचा बंदोबस्त करावा यासाठीं आहे, आणि हा महत्त्वाचा मुद्दा विसरून चालणार नाहीं."

---


**THE BRIHAN-MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LIMITED, POONA 2.**

## NOTICE

Notice is hereby given that an Extra Ordinary General Meeting of the Share-holders of the above Company will be held at the Tilak Smarak Mandir, Tilak Road, Poona 2, on Sunday, the 28th day of June 1953 at 1. p. m. when the special Resolution for altering the following articles will be proposed—

"To change articles

Nos. 54, 66 (3), 68, 69, 71, 90, 102, 110, 155 and 157 of the Articles of Association of the Company as per details being circulated to the Share-holders."

By Order of the Board of Directors

Poona, Dated 1st June 1953. (Sd.)- C. G. Agashe & Co. Managing Agents.


---


**The Poona Central Co-operative Bank Ltd., Poona City.**

*Laxmi Road, Poona 2.*

## TENDER NOTICE

FOR

"Construction of Bank's Building at KHED District Poona."

(1) Sealed item rate tenders in the prescribed form are invited for the work of constructing a building at Khed for the Poona Central Co-operative Bank, Ltd.,

(2) Drawings and specifications and conditions of contract can be seen in the Head Office of the Poona Central Co-op. Bank, Ltd., Poona, during office hours on all working days.

(3) The Poona Central Co-op. Bank credit Chalan for the amount of Rs. 165/- must accompany the tender as earnest money.

(4) Successful tenderer will have to pay Rs.825/- as security Deposit in cash within a week from the receipt of intimation of acceptance of the tender. This includes the earnest money also.

(5) Tender forms will be issued from 5-6-1953 to 12-6-1953 on payment of Rs. 10/- per set. Tenders, sealed and superscribed, "Tender for the work of constructing a building at Khed for the Poona Central Co-op. Bank, Ltd." will be received by the undersigned upto 4 p. m. on 15-6-1953 and will be opened on the same day by the undersigned.

(6) The tenderers will also furnish with the tender a list of works done by them.

(7) The successful tenderer will have to execute an agreement on a stamped paper in the prescribed form within a week from the date of acceptance of the tender, failing which the amount of earnest money will be forfeited.

(8) The undersigned reserves the right to accept any one of the tenders or to reject all tenders without assigning any reason therefor.

(9) The notice of tender will form one of the tender documents and will be signed by the tenderer.

**R. Y. BORKAR,**
Chairman,
Poona Central Co-op. Bank, Ltd., Poona 2.

Poona;
Dated: 1st June 1953.

## सांगली सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परीक्षेचा निकाल.

द. सातारा जि. को. बोर्डाच्या विद्यमानें सांगली येथें ता. २०-२-५३ तें २०-४-५३ अखेरीस झालेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाच्या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणें जाहीर करण्यांत आला आहे.

परीक्षेस एकूण २३ विद्यार्थी बसले होते. त्यांपैकी दुसऱ्या वर्गांत ६ व तिसऱ्या वर्गांत १२ असें एकून १८ विद्यार्थी पास झाले. पास विद्यार्थीचें शेंकडा प्रमाण ७८.६ आहे.

वर्ग दुसरा मार्क्स प्रमाणें नंबर्सः-( १ ) खोचीकर आ. बा. ( २ ) जाधव कृ. दा. ( ३ ) जाधव बा. कृ. ( ४ ) जाधव रा. पां. ( ५ ) नायकवाडी रं. हं. ( ६ ) कोठावळे श्री. धो.

तिसरा वर्ग मार्क्स प्रमाणें नंबर्सः-( ७ ) देशमुख आ. दा. ( ८ ) देशमुख मा. भा. ( ९ ) गंगातीरकर वा. ग. ( १० ) झेटे भ. भि. ( ११ ) मोरे म्है. सा. ( १२ ) स्वामी गु. भि. ( १३ ) खोत सा. मा. ( १४ ) गौंडाजे श्री. बा. ( १५ ) महंकाळ रा. म. ( १६ ) देशमुख अ. द. ( १७ ) पाटील धो. ल. ( १८ ) पाटील आ. ने.

---

## दि बँक ऑफ औंध लि.

३१-१२-५१ अखेरचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,६८,२८० | कॅश, बँकांत | १,८३,५३४ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ५५,६७५ | इनव्हेस्टमेंटस | ४,९०,८८१ |
| ठेवी | ९,६६,९०३ | कर्जें | ६,२३,४४१ |

---

**राजा भिकारी झाला**—रुमेनिआचे पदभ्रष्ट राजे मायकेल हे आतां अगदीं दरिद्री झाले आहेत. त्यांच्या वडिलांनीं बऱ्याच डॉलर्स किंमतीची मालमत्ता मागें ठेवली आहे. परंतु तीवर त्यांची बायको मॅडम लुपेस्कू ह्यांचाच हक्क आहे. मॅडम लुपेस्कू ह्यांच्याकडून कांहीं मालमत्ता मिळविण्याचा प्रयत्न मायकेल ह्यांचे वकील करीत आहेत.

**इंग्लंडला चीनशी व्यापार पाहिजे**— ब्रिटनच्या कापड आणि रासायनिक धंद्यातर्फे अशी मागणी करण्यांत येत आहे कीं चीनला एक व्यापारी-मंडळ धाडण्यांत यावें. कोरिआंतील युद्ध बंद करण्याच्या दृष्टीनें चीननें समजूतदारपणाची भूमिका घेतल्यामुळें चीनशी मोठा व्यापार करतां येईल असें त्या धंद्यांतील लोकांना वाटूं लागलें आहे.

**जमीन धुपूं न देण्याचें शिक्षण**— उत्तर प्रदेशांतील कांहीं जिल्ह्यांत जमीन धुपूं न देण्याचा प्रश्न फार तांतडीचा झाला आहे. जिल्ह्यांच्या विकास-योजना पार पाडण्यासाठीं जमीन धुपूं न देणें फार आवश्यक आहे. झांशी जिल्ह्यांतील चार ग्राम सेवकांना सोलापूर जिल्ह्यांत वरील विषयाचें शिक्षण घेण्यासाठी धाडण्यांत येणार आहे.

**विनोबांना अमेरिकेची देणगी**— आचार्य विनोबा भावे ह्यांचे एक अमेरिकन भक्त मि. वॉल्टर्स ड्रुक ह्यांनीं कूपदान यज्ञासाठी ५०० रुपयांचा चेक पाठविला आहे. गया जिल्ह्यांत विहिरी खणण्यासाठी या रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. 'हरिजन'चे माजी संपादक श्री. मश्रुवाला ह्यांच्या स्मरणासाठी जी विहीर खोदण्यांत येईल तीवर त्यांच्या नांवाची पितळी पाटी लावण्यांत यावयाची आहे.


**DECCAN INSTITUTE OF COMMERCE**

**594 Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1953-54 Session on Monday the 22 June 1953.

Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (First Part); G. D. C. and A., Dip. I. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting Examinations. Morning and Evening classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

---

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः-भोर, जि. पुणें.**

**शाखाः-पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

---

# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८०३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.